वागळे वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/७७२/२०२६ दि. ०२/०९/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, वागळे वाहतूक उप विभागाचे हद्दीत दिनांक ०५/०९/२०२६ रोजी संकल्प प्रतिष्ठान, ठाणे यांच्या वतीने साई चेबर्स मित्तल पार्क, संकल्प चौक, रघुनाथ नगर, वागळे ईस्टेट, ठाणे पश्चिम येथे **'दहीहंडी'** हा कार्यक्रम असुन सदर कार्यक्रमा करीता मोठया प्रमाणात व्हि.आय.पी., गोविंदा पथके तसेच नागरीक उपस्थित राहतात. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) साईमास हॉटेल/मोहनजी सुंदरजी मार्गा कडुन संकल्प चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **साईमास हॉटेल** जवळ **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – साईमास हॉटेल कडुन संकल्प चौकाकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने ही सर्व्हीस रोडने सरळ जावुन एल.आय.सी. ऑफिस येथुन डावीकडे वळण घेवुन इच्छीत स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) जुना पासपोर्ट ऑफिस कडुन संकल्प चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जिलानेवाडी, अर्जुना पार्क बिल्डीग** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची सर्व वाहने जिलानेवाडी, अर्जुना पार्क बिल्डींग येथुन डावीकडे वळुन हाजुरी चौकातुन इच्छीत स्थळी जातील.

नो पार्कींग – जुना पासपोर्ट ऑफिस कट ते जिलानेवाडी पर्यंत रोडच्या दोन्ही बाजुस एकुण २०० मीटर सर्व प्रकारच्या वाहनांना **नो पार्कींग** करण्यात येत आहे.

नो पार्कींग – साईमास हॉटेल ते संकल्प चौक पर्यंत रोडच्या दोन्ही बाजुस एकुण ६०० मीटर सर्व प्रकारच्या वाहनांना **नो पार्कींग** करण्यात येत आहे.

नो पार्कींग – तिनहात नाका जंक्शन ते साईमास हॉटेल पर्यंत रोडच्या दोन्ही बाजुस एकुण १०० मीटर सर्व प्रकारच्या वाहनांना **नो पार्कींग** करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना दि. ०५/०९/२०२६ रोजी सकाळी ०८:०० वा. पासुन ते रात्रौ २३.४५ वाजे पावेतो अंमलात राहील.

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग व वाहतूक उप विभाग ठाणे शहर.

स्केचमध्ये